महाराष्ट्रातील गुन्हेगारीविरुद्ध लढा देणारे एकमेव मराठी वृत्तपत्र...

# महाराष्ट्र क्राईम टाइम्स

संपादकः- राकेश शंकर गोरे

प्रकाशन - मुंबई, एकाच वेळी प्रसारीत ठाणे, पालघर, रत्नागिरी, पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, जालना, नाशिक

Website: maharashatracrimetimes.com  www.facebook.com/maharashtra.c.times  Info@maharashtracrimetimes.com  Twitter- @MHCrimeTimes  Whatsapp -9803386748

मूल्य २/- रुपये

● वर्ष : १२ ● अंक: १२ ● पृष्ठ: ४ ● मुंबई, मंगळवार २२ जून २०२१ ते सोमवार २८ जून २०२१ ● RNI. REG. NO. 105858/2010 ● POSTAL REGISTRATION NO. MCN/157/2020-2022

## सुविचार

आपल्या स्वप्नांवर मेहनत घेतली की नशीब बदलायला वेळ लागत नाही.

## थोडक्यात

### महापौर किशोरी पेडणेकर 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस लंडन'ने सन्मानित

**मुंबई (निशाल पाटील)-** कोरोना काळात मुंबईकरांसाठी दिलेल्या विशेष योगदानाबद्दल मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांना 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस लंडन'कडून महापालिका मुख्यालयातील महापौर



दालनात सन्मानित करण्यात आले. 'वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्डस लंडन'चे अध्यक्ष संतोष शुक्ला यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र अध्यक्षा फराह सुलतान अहमद यांनी महापौर किशोरी पेडणेकर यांना ट्रॉफी आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले. एक महिला आणि युवतींचे नेतृत्व करणाऱ्या महिला महापौर म्हणून किशोरी पेडणेकर यांचा आम्हाला अभिमान असून सर्वच महिला वर्गासाठी त्या प्रेरणास्रोत असल्याचे श्रीमती फराह सुलतान अहमद यांनी सांगितले. कोरोना काळात त्यांच्या कामाची धडाडी व उत्साह हा आम्हाला प्रेरणा देणारा असून त्यांच्या या कार्याची दखल घेऊनच आम्ही सन्मानित केले असल्याचे त्यांनी सांगितले.

### मुंबई अनलॉक कधी होणार? 'या' तारखेपर्यंत लेव्हल ३ चे निर्बंध कायम

**मुंबई (विशाल कारंडे):** कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी सरकारनं ब्रेक द चेन सुरू केलं होतं. त्यासाठी जिल्हाबंदी, लॉकडाऊन, विकेण्ड लॉकडाऊन अशा विविध योजना राबवल्या होत्या. कोरोनाची रुग्णसंख्या कमी होऊ लागल्यानंतर हळूहळू महाराष्ट्रात अनलॉ



क सुरू करण्यात आलं आहे. ५ टप्प्यांमध्ये महाराष्ट्रात अनलॉक करण्यात येत आहे. मुंबईमध्येमध्ये मात्र संपूर्ण अनलॉकसाठी अवकाश लागेल.

सध्या मुंबई लेव्हल ३ मध्ये राहणार आहे. मुंबईत आजपासून २७ जूनपर्यंत लेव्हल ३चे निर्बंध कायम राहतील अशी माहिती मुंबईच्या आयुक्तांनी दिली आहे. मुंबईत पॉझिटीव्हिटी रेट ३.७९३ आणि रिक्त ऑक्सिजन बेड ३०.५६३ आहेत. मात्र तरीही कोरोनावर नियंत्रण ठेवण्यासाठी आयुक्तांनी हा निर्णय घेतला आहे. या आकडेवारीनुसार मुंबई पहिल्या टप्प्यामध्ये आहे. मात्र, खालील बाबींचा विचार करुन मुंबईला लेव्हल ३चेच निर्बंध लावण्यात येणार आहेत.

# सर्वसामान्यांवर दरवाढीचा बोजा टाकून सरकारची पेट्रोल-डिझेलमधून ५.२५ लाख कोटींची कमाई




**नवी दिल्ली/मुंबई (योगेश होळंब): कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कराव्या लागलेल्या लॉकडाऊनचा परिणाम उद्योगधंद्यांवर झाला. त्यामुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. लाखो लोकांना पगार कपात सहन करावी लागली. लॉकडाऊनमुळे अनेकांचं उत्पन्न घटलं. मात्र सरकारनं याच कालावधीत पेट्रोल, डिझेलवरील करांमुळे छप्परफाड कमाई केली. लोकांना दिलासा देण्यासाठी करांमध्ये कपात करण्याची मागणी होत असताना सरकारनं कर कायम ठेवले. त्याचा थेट फटका सर्वसामान्य जनतेला बसला.**

सध्याच्या घडीला इंधनावर लागू असलेल्या करांमधून मोदी सरकार बक्कळ कमाई करत आहे. त्यामुळे पहिल्यांदाच सरकारला प्राप्तिकरातून मिळणाऱ्या उत्पन्नापेक्षा जास्त उत्पन्न पेट्रोल, डिझेलवरील करांतून मिळालं आहे. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये सरकारनं पेट्रोलियम पदार्थांच्या विक्रीतून तब्बल ५.२५ लाख कोटी रुपयांची कमाई केली. याच कालावधीत प्राप्तिकराच्या माध्यमातून सरकारला ४.६९ लाख कोटी रुपये मिळाले. कंपन्यांनी भरलेल्या कॉर्पोरेट करांतून सरकारला ४.५७ लाख कोटी रुपये मिळाले आहेत.

पेट्रोल, डिझेलवर सरकारकडून प्रचंड कर आकारला जातो. यात उत्पादन शुल्क, मूल्यवर्धित कर यांच्यासह आणखी अर्धा डझन लहान करांचा, शुल्कांचा आणि सेसचा समावेश होतो. आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये पेट्रोलियम पदार्थांच्या विक्रीतून सरकारला ५.२५ लाख कोटी रुपये मिळाले. यामध्ये केंद्र सरकारकडून घेतला जाणारा अबकारी कर आणि राज्यांचं मूल्यवर्धित कर यांचा समावेश आहे. मूल्यवर्धित करांचा आकडा केवळ डिसेंबरपर्यंतचा आहे. मूल्यवर्धित करांच्या माध्यमातून मार्च तिमाहीत राज्यांना मिळालेल्या उत्पन्नाचा यात समावेश नाही.

याच कालावधीत प्राप्तिकराच्या रुपात सरकारच्या तिजोरीत ४.६९ लाख कोटी रुपये जमा झाले. तर कंपन्यांनी जमा केलेल्या कॉर्पोरेट करांच्या माध्यमातून ४.५७ लाख कोटी रुपये मिळाले. आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये पेट्रोल, डिझेलवरील उत्पादन शुल्क आणि मूल्यवर्धित करांच्या माध्यमातून सरकारला ४.२३ लाख रुपये मिळाले होते. आता यात तब्बल १ लाख कोटी रुपयांची भर पडली आहे. देशाच्या इतिहासात पहिल्यांदाच सरकारला इंधनावरील करांमधून सरकारला सर्वाधिक रक्कम मिळाली आहे.

## पेट्रोलच्या वाढत्या किंमतीपासून होणार सुटका; क्रेंद्र सरकारचा मोठा निर्णय

**मुंबई (राजेश गायकवाड):** पेट्रोलच्या सतत वाढत्या किंमतींमुळे ग्राहक त्रस्त झाले आहेत. पेट्रोलच्या वाढत्या किंमतीवर सरकारचं नियंत्रण नसल्याचं वारंवार दिसून आलं. कारण पेट्रोल-डिझेलचे दर हे आंतरराष्ट्रीय बाजारत निश्चित होतात. त्यामुळे पेट्रोल-डिझेलच्या किंमतीवर कोणत्याही प्रकारचा निर्णय सरकार घेवू शकत नाही. पण सरकारकडे यावर एक पर्यायी उपाय आहे. पेट्रोलच्या जागी एक असं इंधन येईल ज्याचे दर फार कमी असतील. तर या इंधनाचं नाव आहे इथेनॉल. येत्या ८ ते १० दिवसांत केंद्र सरकार फ्लेक्स फ्यूल इंजिन वर मोठा निर्णय घेणार आहेत. ऑटोमोबाईल उद्योगासाठी अशी इंजिन अनिवार्य करण्यात येणार आहेत. फ्लेक्स फ्यूल म्हणजे इतेंग्त इल. रस्ते आणि परिवहन मंत्री नितीन गडकरी यांच्या म्हणण्यानुसार या पर्यायी इंधनाची किंमत ६० ते ६२ रूपये प्रति लिटर असणार आहे. आता पेट्रोलचे दर १०३ रूपयांवर गेल्यामुळे



इथेनॉल उत्तम इंधन असल्याचं सांगितलं जात आहे. इथेनॉल इंधनाचा वापर केल्यास पेट्रोल ग्राहकांचे ३० ते ३५ रूपये वाचणार आहेत. नितीन गडकरी म्हणाले, 'मी परिवहन मंत्री आहे' फक्त पेट्रोल इंजिन नाही तर फ्लेक्स-फ्यूल इंजिन तयार करण्याचे आदेश मी जारी केले आहेत. ज्यामुळे ग्राहकांपुढे आता दोन पर्याय असणार आहेत. एक म्हणजे १०० टक्के कच्च्या तेलाचा वापर करू शकतात. किंवा १०० टक्के इथनॉलचा वापर करू शकतात.

## मोदींविरोधात पवारांचा पॉवरफूल डाव!; भाजपाविरोधी पक्षांची घेणार बैठक

**मुंबई (जसबीरकौर भामरा)-** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी देशभरात भाजपा विरोधी पक्षांची मोट बांधण्यास सुरुवात केली आहे. २०२४ निवडणुकीपूर्वी शरद पवार विरोधकांना एकत्र आणण्याची रणनिती आखत असल्याचं बोललं जात आहे. निवडणूक रणनितीकार प्रशांत किशोर यांच्याशी चर्चा केल्यानंतर मंगळवारी दुपारी ४ वाजता बैठकीचं आयोजन करण्यात आलं आहे. करोना काळात पहिल्यांदाच विरोधक व्हिडिओ कॉन्फरन्सऐवजी एकत्र बैठकीला उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रमंचच्या माध्यमातून १५ पक्षांचे प्रमुख या बैठकीला उपस्थित राहण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय जनता दल नेते तेजस्वी यादव यांनाही या



बैठकीचं आमंत्रण देण्यात आलं आहे. मात्र या बैठकीचं काँग्रेसला बोलवणं नाही. राष्ट्र मंचच्या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार पहिल्यांदाच भाग घेणार आहेत. राष्ट्र मंचची पायाभरणी २०१८ साली यशवंत सिन्हा यांनी केली होती. सध्या तरी कोणत्याच राजकीय वाटलीची घोषणा राष्ट्र मंचाकडून करण्यात आलेली नाही. मात्र भविष्यात तिसरी आघाडी स्थापन करण्याची शक्यता राजकीय जाणकारांनी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर ममता बॅनर्जी यांना तिसऱ्या आघाडीचा चेहरा बनवण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याचं बोललं जात आहे. तसेच शरद पवार तिसऱ्या आघाडीच्या संयोजकपदाची भूमिका पार पाडतील असंही सांगण्यात येत आहे. निवडणूक रणनितीकार प्रशांत किशोर यांनी शरद पवार यांची एकाच आठवड्यात दुसऱ्यांदा भेट घेतल्यानंतर राजकीय चर्चांना उधाण आलं आहे. पहिल्या बैठकीत जवळपास ४ तास या दोघांमध्ये चर्चा झाली होती. त्यानंतर ११ जूनला पुन्हा एकदा बैठक झाल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या होत्या. भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना २०२४ च्या निवडणुकीत रोखण्यासाठी रणनिती आखली जात असल्याचं बोललं जात आहे.

## नवी मुंबई विमानतळ नामांतर वाद : राज ठाकरे म्हणतात, 'स्वतः बाळासाहेब असते तर त्यांनी'

**नवी मुंबई (अकिल शेख)-** नवी मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळाला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचेच नाव देण्यावर सरकार ठाम असतानाच या विमानतळाला रायगडमधील लोकप्रिय नेते दि. बा. पाटील यांचेच नाव देण्याची कृती समितीची मागणी कायम आहे. असं असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केलं आहे. यावेळी त्यांनी विमानतळाला छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव देण्यात यावं अशी मागणी केली आहे. तसेच या विमानतळाला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचं नाव देण्यासंदर्भातील प्रश्नावर त्यांनी आपलं मत मांडताना बाळासाहेब असते तर त्यांनी काय म्हटलं असतं यासंदर्भातही भाष्य केलं. राज मुंबईमधील पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. नवी मुंबई




विमानतळाला शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंचं नाव देण्याचा राज्य सरकारचा प्रस्ताव आहे. तशी मागणी केली जात आहे असा प्रश्न पत्रकारांकडून विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना राज ठाकरेंनी, 'स्वत: बाळासाहेब असते तर त्यांनीही छत्रपती शिवाजी महाराजांचं नावं द्या असं सांगितलं असतं,' असं मत व्यक्त केलं.

## नागपूर हादरलं, एकाच कुटुंबातील ५ जणांची हत्या करून आरोपीची आत्महत्या

**नागपूर (शकिल शेख)-** नागपूरमध्ये गुन्हेगारीच्या घटनांचे सत्र सुरू आहे. शहरातील तहसील पोलीस स्टेशनच्या हद्दीत एकाच कुटुंबातील ५ जणांची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पाच जणांची हत्या केल्यानंतर एकाने आत्महत्या केली आहे. या घटनेमुळे नागपुरात एकच खळबळ उडाली आहे.

नागपूरमधील तहसील पोलीस ठाण्याच्या हद्दीत ही घटना घडली आहे. दुपारी १२ वाजेच्या सुमारास ही घटना घडली. अलोक माथुरकर असं हत्या आणि आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीचे नाव आहे.



अलोक माटूळकर यांने आपल्या कुटुंबातील पाच जणांची हत्या केली. हत्या केल्यानंतर स्वत: आत्महत्या केली आहे. अलोक माटूळकर याने आपली पत्नी, मुलगी, मुलगा, सासू व मेव्हणीची हत्या केली. या हत्याकांडामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पंचनामा करून सर्व मृतदेह ताब्यात घेतले आहे. मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी शासकीय रुग्णालयात पाठवले आहे. अलोक हे टेलरिंगचे काम करायचे. प्रमोद भिसिकर यांच्या घरी भाड्याने राहायचे. कौटुंबिक कलहातून हत्या झाल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

## करोना संपेपर्यंत सर्वसामान्यांना मुंबई लोकल प्रवासबंदी?

**मुंबई (दिपेश गोरिवले)-** मुंबईत करोनाची संसर्ग कमी होत असून रुग्णसंख्या कमी होण्यास सुरुवात झाली असल्याने सध्या सर्वांनाच लोकल कधी सुरु होणार याची प्रतिक्षा लागली आहे. अद्याप लोकलने प्रवास करण्याची परवानगी मिळत नसल्याने अनेक चाकरमान्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे मुंबईची लोकल सर्वसामान्यांसाठी कधी सुरु होणार असा प्रश्न वारंवार विचारला जात आहे. दरम्यान राज्याचे मदत आणि पुनर्वसन मंत्री विजय वडेट्टीवार यांनी करोना संपल्याशिवाय मुंबईची लोकल सर्वसामान्यांसाठी सुरु होणार नाही असं स्पष्ट सांगितलं आहे. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



दरम्यान पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनीही लोकल इतक्यात सुरू करण्याबाबत असमर्थता दर्शवली होती. लोकल सुरू करताना ती टप्प्याटप्प्याने म्हणजेच आधी महिलांसाठी किंवा विशिष्ट कर्मचाऱ्यांसाठी अशा पद्धतीने सुरू केली जाण्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे. मात्र मुंबईत रुग्णसंख्या कमी होत असली तरी टप्पा तीनचेच निर्बंध सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला असल्याने लोकलने प्रवास करण्यासाठी वाट पहावी लागणार असल्याचं स्पष्ट आहे. मुंबईतील करोना रुग्णांची संख्या कमी होत असली तरी मुंबईत सोमवारपासून सध्याच्या निर्बंधांमध्ये कोणतेही बदल करण्यात आलेले नाहीत. राज्य सरकारच्या निकषांनुसार मुंबईचा समावेश आता टप्पा एकमध्ये झालेला असला तरी तिसऱ्या लाटेची शक्यता तज्ज्ञांनी वर्तवल्यामुळे सावधगिरीचा उपाय म्हणून पालिका आयुक्त इक्बाल सिंह चहल यांनी टप्पा तीनचेच निर्बंध सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

## मराठा मूक आंदोलन महिनाभरासाठी स्थगित, सरकारलाही एक महिन्याची डेडलाईन: संभाजीराजे

**नाशिक (नितीन देवळेकर):** मराठा आरक्षणासाठी पुणे ते विधानभवन लाँगमार्च काढावा अशी आमची इच्छा नाही. सरकारने एक महिन्यात आमच्या मागण्या मार्गी लावाव्या. आमची आंदोलने थांबली नाहीत. बैठकाही सुरूच राहणार आहेत. मात्र, सरकार २१ दिवसात प्रश्न मार्गी लावत असल्याने एक महिना मराठा मूक आंदोलन पुढे ढकलत आहोत, असं जाहीर करतानाच या महिन्याभरात आमच्या मागण्या मान्य झाल्या नाही तर पुढच्या आंदोलनाची दिशा ठरवली जाईल, असा इशारा



खासदार संभाजी छत्रपती यांनी दिला आहे. खासदार संभाजी छत्रपती यांनी आज सकाळी नाशिकमध्ये मूक मोर्चाचं आयोजन केलं होतं. त्यानंतर आता त्यांनी पत्रकार परिषद घेऊन त्यांची भूमिका स्पष्ट केली. राज्य सरकारने मागण्या मान्य केल्या आहेत. त्याची अंमलबजावणी व्हायला २१ दिवस लागतील. प्रशासकीय स्तरावर त्याची अंमलबजावणी होत आहे, असं सांगतानाच समन्वयकांनी आंदोलन न थांबवण्याचा निर्णय घेतला आहे. सरकारने एक महिन्यात मागण्या पूर्ण कराव्यात नाही तर पुढची दिशा ठरवावी लागेल, असं संभाजी छत्रपती यांनी सांगितलं. तसेच मराठा मूक मोर्चा एक महिन्यासाठी स्थगित करण्यात येत असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. आम्ही मराठा आरक्षणासाठी कोल्हापूर, नाशिक, रायगड, औरंगाबाद आणि अमरावती या ठिकाणी मूक आंदोलन करण्याची घोषणा केली होती. त्यानुसार कोल्हापूर आणि नाशिकमध्ये आंदोलन झालं आहे. ३६ जिल्ह्यात जायची आमची इच्छा नाही. आम्हाला समाजाला दिशाहीन करायचं नाही. त्यांना दिशा द्यायची आहे.

## भाजपला मोठं भगदाड, आजी माजी १२ नगरसेवक शिवसेनेत, राज्याच्या राजकारणात मोठ्या घडामोडी

**मुंबई (विशाल कारंडे)-** मुख्यमंत्री उद्धव ठाकरे आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटीनंतर महाराष्ट्रातील राजकारणात युतीचे तर्क लढवले जात असताना, भाजपला धक्का देणारी बातमी समोर आली आहे. शिवसेनेने पुन्हा भाजपला धक्का दिला आहे. कारण थोडेथोडके नाही तर तब्बल आठ ते नऊ नगरसवेकांनी शिवबंधन बांधण्याचा निर्णय घेतला आहे. विदर्भातील वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट नगरपरिषदेचे हे नगरसेवक आहेत. त्यामुळे विदर्भात भाजपला सर्वात मोठं भगदाड पडल्याचं चित्र आहे. निवडणुकीपूर्वी हिंगणघाट नगरपरिषदेतील भाजपचे आठ



ते नऊ नगरसेवक शिवसेनेत प्रवेश करत आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचं निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यावर येऊन ते शिवबंधन बांधत आहेत. भाजपचे स्थानिक आमदार समीर कुणावर यांच्या कामालो कंटाळून शिवसेना प्रवेश करत असल्याचं सांगण्यात येत आहे. शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांच्या लेटर बॉम्बमुळे पुन्हा एकदा राज्यात शिवसेना आणि भाजपा युती होणार का याची चर्चा सुरू झालीय. शिवसेनेनं मात्र पक्ष बळकट करण्यासाठी मोर्चे बांधणी सुरूच ठेवलीय. आज भाजपच्या बालेकिल्ल्यातील नगरसेवक फोडून शिवसेनेनं भाजपला उघड आव्हानच दिलंय. गेली काही वर्षे सातत्याने विदर्भ भाजपचा बालेकिल्ला म्हणून पुढे आला आहे.



संपादक:- राकेश शंकर गोरे

# मुंबई मॉडेल - कार्यपद्धती आणि बोलबाला

**मुंबईचे आयुक्तपद इक्बालसिंग चहल यांनी पहिल्या लाटेवेळी स्वीकारले. त्यानंतर धडक कारवाई, निर्णयांवर निर्णय, कामांचे विकेंद्रीकरण आणि प्रसंगी स्वतःच्या संपर्कांचा वापर करून मुंबईला दुसऱ्या लाटेच्या आपत्तीतून बाहेर काढले. मुंबई मॉडेलचे सध्या कौतुक होते आहे, तरीही सावधानता महत्त्वाचीच आहे. भारताची कोरोनाने दाणादाण सुरू असताना मुंबई सावरते आहे. रुग्णसंख्येचा आलेख घसरतो आहे. मुंबई मॉडेलचा बोलबोला आहे. टिकेचे धनी झालेले महाविकास आघाडी सरकार आंतरराष्ट्रीय दर्जाचे महानगर मुंबई कसे कोरोना संकट दूर करु शकले हे सांगून पत वाढवू शकते. याचे श्रेय आयुक्त इक्बालसिंग चहल आणि महापालिका व्यवस्थापनाला आहे. पण जे साध्य केले ते कौतुकास्पद आहे.**

कोरोनाचे संकट तसे वैश्विक. त्याची व्याप्ती जागतिक. प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या देशांनी कोरोनाचा कसा सामना केला, त्या-त्या ठिकाणची लढण्याची परिमाणे काय होती याचा लेखाजोखा पुढची कित्येक वर्षे अभ्यासाचा विषय ठरेल. हिशेब मांडला जाईल. त्यातून चुका कळतील. हे स्वाभाविकच असेल. मानवजात शिकत समजतच पुढे जात असते. देशांच्या कहाण्या जशा तपासल्या जातील तशीच महानगरांच्या प्रतिसादाची चिकित्सा होईल. त्यामुळे मुंबई मॉडेलची चर्चा महत्वाची ठरते. ती सुरू करण्यापूर्वी जगातल्या आघाडीच्या महानगरांनी कोरोना कसा हाताळला ते थोडक्यात पाहावे लागेल. न्यूयॉर्कला पहिल्या लाटेने पार गारद केले, मृत्यूंचे हादरवणारे आकडे, अंत्यसंस्कारांसाठी लागलेल्या रांगांची करूण कहाणी सांगत होते. मग उपचारपद्धती विकसित होत गेली. अनुभवातून उपचारपद्धती निश्चित होत गेली. तुलनेत लंडन वाचले. तेथे लॉकडाऊन आणि लसीकरण असा दुहेरी प्रयोग उत्तम यश देवून गेला. इटालीला कोरोनाने खूप छळले, दम लागला लढताना. पण रोम, मिलान ही तुलनेने कमी लोकसंख्येची शहरे. त्यांची मुंबईशी तुलना करणे अयोग्य.

भारतातले बघितले तर दिल्लीत माजलेला हाहा:कार अंगावर काटा आणणारा. बंगळुरूही चिंता वाढवणारे. पहिल्या लाटेत मुंबईचीही दाणादाण उडालेली. खरे तर परदेशातून येणाऱ्या प्रवाशांचे विलगीकरण योग्य झाले असते तर कदाचित महाराष्ट्रातला फैलाव आटोक्यात राहिला असता. आज केंद्र सरकारच्या ज्या चुका होताहेत तशीच गोंधळलेली निर्णायकी अवस्था त्यावेळी महाराष्ट्रात होती. त्यामुळेच राज्यातली सगळी मोठी शहरे आजारी होती, मोकळा श्वास घेणे मुश्कील झाले होते. दुसऱ्या लाटेतही पुणे, नाशिक, नागपूर ही शहरे फारशी सावरलेली नाहीत. मुंबई मात्र सावरण्याच्या मार्गावर आहे. कोरोना व्यवस्थापनात चमकदार कामगिरी करू शकले नाही, असा आरोप दररोज सोसणाऱ्या महाराष्ट्रातल्या महाविकास आघाडी सरकारला मुंबईचा महाआधार मिळाला. वर्षापूर्वी धक्कातंत्राचा अवलंब करीत आयुक्तपदी नेमलेल्या इक्बालसिंग चहल यांनी या संकटाचा सामना करणारे मॉडेल तयार केले. ते अंमलात आणून ते थांबले नाहीत, तर देशात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरही त्यांनी नेले.



कामकाजाचे विकेंद्रीकरण

कोरोनामुळे उडालेली दाणादाण रोखण्यात सर्वपक्षीय राजकीय नेतृत्व खुजे ठरले असल्याने चहल यांची प्रशंसा होवू लागली. सध्या तरी दाटीवाटीने वाढलेल्या समस्याग्रस्त मुंबईची कोरोनास्थिती सुधारली आहे. फैलाव नियंत्रणात आहे. सार्वजनिक रुग्णालयात खाटा उपलब्ध आहेत. प्राणवायू व्यवस्थापनाबद्दल सर्वोच्च न्यायालयाने मुंबईचे कौतुक केले. राज्यकर्ते आणि प्रशासनावर रुसलेल्या न्यायालयांनी पाठ थोपटणे आजच्या स्थितीत फारच दुर्मिळ. चहल यांना ते भाग्य लाभले. अर्थात त्यांनी त्यासाठी प्रशासनातले सगळे कसब पणाला लावले. शिवाय अत्यंत खुबीने प्रसिद्धी तंत्राचाही वापर केला. चहल यांनी आयुक्तपदाची सुत्रे हाती घेताच पहिल्याच दिवशी पीपीई सूट घालून रुग्णालयात शिरले. तेथील गैरव्यवस्थापनाच्या कहाण्यांमागचे कारण असणाऱ्या व्यवस्थापनाला तो इशारा होता. कामचुकारांनी बोध होता. ढेपाळलेली यंत्रणा कामाला लागली. त्यांनी मुंबई हाताळणाऱ्या व्यवस्थांचे केंद्रीकरण रोखून, शहराचे २४ विभाग केले अन बृहन्मुंबई या २४ भागात वाटून टाकली. रुग्णांच्या चाचण्या, विलगीकरण, उपचारासाठी रुग्णालयात दाखल व्हायचे असेल तर मदत करणारे कक्ष विकेंद्रीत झाले. ताण घटला. व्यवस्थापन सोपे झाले.

ज्येष्ठ काँग्रेस नेते सुशीलकुमार शिंदे, केंद्रीय गृहमंत्री असताना त्यांचे सचिव ही जबाबदारी पार पाडणाऱ्या चहल यांची दिल्ली दरबारातल्या बड्यांबरोबर उठबस. ती ओळखपाळख वापरून चहल यांनी मुंबईच्या गरजा पूर्ण करून घेतल्या. थेट केंद्रीय गृहसचिव राजीव गुब्बा यांच्याकडेच वजन वापरले. एका रात्री जम्बो कोविड रुग्णालयाचा प्राणवायू पुरवठा कमी झाला तेव्हा चहल यांनी अतीदक्षता विभागातले तब्बल १६८ रुग्ण निरनिराळ्या रुग्णालयात हलवले अन सगळ्यांचे जीव वाचवले. आयुक्त हिरो ठरले.

मुंबईकर तसाही जागरूक. संकटांशी सामना करण्याची सवय झालेला. तो कटाक्षाने मास्क वापरू लागला. पालिका प्रशासनही मुंबईच्या कार्यसंस्कृतीचा परिचय देणारे.

# आयआयटीमार्फत कोपरी पुलाची तपासणी

**ठाणे (तृप्ती गोरे)-** मुंबई आणि ठाणे शहराच्या वेशीवर वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उभारण्यात आलेल्या नवीन कोपरी पुलाच्या उद्घाटनाआधीच त्यावरील रस्त्याला तसेच संरक्षण कठडा आणि रस्त्याखालील विटांना मोठे तडे गेल्याचा प्रकार उघडकीस



आला आहे. या मार्गावर पडलेल्या तडट्याची तपासणी मुंबई आयआयटीमार्फत केली जाणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने बुधवारी या तपासणीसंबंधीची माहिती दिली. या घडामोडींमुळे कोपरी पुलाच्या नव्या मार्गिकेचे उद्घाटन लांबणीवर पडण्याची शक्यता आहे. ठाणे आणि मुंबईच्या वेशीवरील कोपरी पूल अरुंद असल्यामुळे या ठिकाणी वाहनांच्या रांगा लागून कोंडी होते. ही समस्या सोडविण्यासाठी काही वर्षांपूर्वी एमएमआरडीएने कोपरी पुलाच्या रुंदीकरणाचे काम हाती घेतले आहे. जुन्या पुलाच्या दोन्ही बाजूला एमएमआरडीएने नव्या पुलाची उभारणी केली आहे. या पुलाचे काम जवळपास पूर्ण होत आल्याने येत्या काही दिवसांत त्याचे उद्घाटन होण्याची शक्यता वर्तविण्यात येत होती. त्याआधीच या पुलावरील सिमेंटच्या रस्त्याला, संरक्षण कठडा आणि पुलाखाली असलेल्या सिमेंटच्या विटांना मोठे तडे गेल्याचा प्रकार महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे ठाणे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव यांनी मंगळवारी उघडकीस आणला होता. या कामात मोठा भ्रष्टाचार झाल्याचा आरोपही त्यांनी केला होता. या प्रकाराची तातडीने दखल घेत मुंबई महानगर विकास प्राधिकरणाच्या वरिष्ठ अभियंत्यांनी बुधवारी पुलाच्या कामाची पाहणी केली. रस्त्याला पडलेले तडे तसेच इतर तक्रारींची तपासणी मुंबई आयआयटीच्या तज्ज्ञांमार्फत केली जाईल, अशी माहिती महानगर प्राधिकरणातील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. या तज्ज्ञांचा अहवाल आल्यानंतर पूल वाहतुकीसाठी सुरक्षित आहे की नाही हे समोर येणार आहे. तोपर्यंत हा मार्ग वाहतुकीसाठी खुला केला जाणार नाही, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा हिस्सा सिडको भरणार

**नवी मुंबई (दिगंबर जाधव):** सिडकोच्या महागृह निर्मितीत घर मिळालेल्या लाभार्थीमधील आर्थिकदृष्टट्या दुर्बल घटकांचा हिस्सा केंद्र व राज्य सरकार भरण्यास सद्य:स्थिती असमर्थ असल्याने सिडको हा हिस्सा भरणार आहे. त्यामुळे सिडकोच्या तिजोरीवर



३५० कोटींचा भार पडणार आहे. केंद्र सरकारने जून २०१५ मध्ये आर्थिकदृष्टट्या दुर्बल घरहीन घटकांना सर्वासाठी घरे ही योजना जाहीर केली असून मार्च २०२२ पर्यंत १कोटी १२ लाख नोंदणीकृत घरहीन नागरिकांना एक कोटी घरे देण्याचे लक्ष्य ठेवले आहे. त्यासाठी ग्रामीण व शहरी भागात एकही घर नसलेल्या नागरिकांना केंद्र व राज्य सरकारकडून अनुदान दिले जाणार आहे. या लाभार्थीना अतिशय कमी दरात कर्ज कमीत कमी चार टक्के उपलब्ध करून दिले जात आहे. दोन्ही सरकारकडून या घरांसाठी दोन लाख ६७ हजार रुपयांचे अनुदान दिले जात असून केंद्र सरकारचा यात एक लाख रुपयांचा प्रति लाभार्थी हिस्सा आहे. हा हिस्सा आल्याशिवाय सिडकोला घरांचा ताबा देणे शक्य नव्हते. या अनुदानव्यतिरिक्त इतर रक्कम भरल्यानंतर घरांचा ताबा दिला जाणार आहे. मात्र गेल्या वर्षापासून सुरू झालेली करोना साथीने केंद्र व राज्य सरकारचे आर्थिक गणित देखील कोलमडून गेले आहे. देशाचा जीडीपी घसरल्याने तिजोरीत आवक कमी झाली आहे तर राज्य सरकार गेली अनेक वर्षे कर्जाचा सामना करीत असून पाच लाख कोटींपेक्षा जास्त कर्जाची रक्कम झाली आहे. त्यामुळे दोन्ही सरकारकडून या घरांमधील आर्थिक हिस्सा मिळणे सध्या तरी दुरापास्त झाले आहे. त्यामुळे या लाभार्थीची अडवणूक न करता सिडको सुमारे ३५० कोटी रुपये ग्राहकांचे दोन्ही सरकारच्या वतीने भरणार आहे. यातील राज्य सरकारचा हिस्सा मिळणे कठीण आहे. ही एक अंगीकृत कंपनी असल्याने सिडकोने हा हिस्सा भरला तरी तो राज्य सरकारने भरल्यासारखा आहे, मात्र केंद्र सरकारकडून मिळणाऱ्या हिस्सा साठी सिडको नागरी मंत्रालयाकडे शेवटपर्यंत प्रयत्न करणार आहे. हा मुद्दा नंतर लेखापरीक्षणात कळीचा ठरण्याची शक्यता असल्याने सिडको दोन्ही सरकारकडून हा हिस्सा मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# इमारतीच्या गच्चीवर सदनिकांची बांधणी

**डोंबिवली (आकाश कांबळे)-** डोंबिवली पूर्वेतील नांदिवली पंचानंद येथील गणेशनगर भागात दोन भूमाफियांनी सात मजली बेकायदा इमारतीचे बांधकाम केले आहे. इमारत बांधून पूर्ण झाल्यानंतर माफियांनी गच्चीवर नव्याने बेकायदा सदनिकांची बांधणी सुरू केली आहे. सात महिन्यांच्या काळात बांधलेल्या या इमारतीचे बांधकाम अतिशय निकृष्ट दर्जाचे आहे. त्यात इमारतीच्या गच्चीवर पुन्हा बांधकाम सुरू करण्यात आल्याने लगतच वास्तव्य करणाऱ्या रहिवाशांनी महापालिकेकडे तक्रारी केल्या आहेत. नांदिवली पंचानंदमधील गणेशनगर भागात भराडी आई अ‍ॅव्हेन्यू आणि यशवंत हाईट्स इमारतीच्या बाजूला ही बेकायदा इमारत आहे. या बेकायदा इमारतीचे बांधकाम सुरू असताना पालिकेच्या २७ गाव नियंत्रक ई प्रभागाने बांधकामधारक संतोष ऊर्फ बबलू तिवारी, आर. जाधव यांना एप्रिलमध्ये बांधकाम तात्काळ थांबविण्याचे आदेश दिले होते. या कालावधीत पालिका हद्दीत करोनाचा कहर सुरू असल्याने महापालिकेची यंत्रणा त्या कामात व्यग्र होती. या संधीचा गैरफायदा घेऊन भूमाफियांनी इमारतीचे बांधकाम कारवाई टाळण्यासाठी पूर्ण केले.



अतिशय निकृष्ट पद्धतीने व घाईघाईने या इमारतीची उभारणी करून माफिया रहिवाशांच्या जिवाशी खेळले आहेत, अशा या इमारतीच्या परिसरातील रहिवाशांच्या तक्रारी आहेत. उपायुक्त पल्लवी भागवत यांनी दत्तनगरमध्ये एका माफियाची बेकायदा इमारत जमीनदोस्त केली. त्या तोडकामाला तिवारी यांनी विरोध केला होता. सरकारी कामात अडथळा आणला म्हणून त्याच्यावर गुन्हा दाखल झाला होता. अटकेची कारवाई होऊन तिवारी २० दिवस रामनगर पोलिसांच्या ताब्यात होता. या इमारतीच्या आजुबाजूला असलेली गटारे तोडून ती जागा इमारत उभारणीसाठी वापरण्यात आली आहेत. नांदिवलीतील बेकायदा इमारतीच्या गच्चीवर सदनिकांचे बांधकाम सुरू असल्याची माहिती मिळताच, ई प्रभागाचे प्रभाग अधिकारी भारत पवार यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. त्यांना इमारतीच्या गच्चीवर भर पावसात घाईने सदनिकांची बांधणी सुरू असल्याचे दिसले. त्यांनी तातडीने ते काम थांबविले. या इमारतीच्या आजुबाजूला असलेले सांडपाण्याचे प्रवाह वाहून जाण्यासाठी गटार व इतर जागा नसल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. ही इमारत जमीनदोस्त करण्याची कार्यवाही वरिष्ठांचे मार्गदर्शन घेऊन केली जाईल, असे पवार यांनी सांगितले.

# ठाणे शहरातील सीसीटीव्ही यंत्रणा कुचकामी?

**ठाणे (शकिल शेख):** ठाणे शहरात महापालिकेने बसविलेल्या १ हजार ४०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी दररोज १५० सीसीटीव्ही कॅमेरे तांत्रिक अडचणी, झाडांच्या फांद्या पडणे, वारा यामुळे बंद होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. दररोज एवढट्या मोठट्या प्रमाणात सीसीटीव्ही कॅमेरे बंद होत असल्याने पोलिसांवरील कामाचा ताण वाढला असून नागरिकांची सुरक्षाही वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे. ठाणे, कळवा आणि मुंब्रा शहरात सुरक्षेच्या दृष्टीने महापालिकेने १ हजार ४०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविले आहेत. या कॅमेऱ्यांमध्ये चित्रित होणारी सर्व माहिती हाजुरी येथील नियंत्रण कक्षात संकलित केली जात असते. नागरिकांच्या सुरक्षेसाठी बसविण्यात आलेले हे सीसीटीव्ही कॅमेरे तांत्रिक अडचणी, झाडांच्या फांद्या पडणे, वारा, पाऊस यांमुळे बंद



होत असल्याचे समोर येत आहे. त्यामुळे दररोज १ हजार ४०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांपैकी दिवसाला १४० ते १५० सीसीटीव्ही कॅमेरे बंद होत असल्याची माहिती महापालिकेतील एका अधिकाऱ्याने दिली. या तांत्रिक अडचणीमुळे पोलिसांचाही कामाचा ताण वाढला आहे. काही दिवसांपूर्वी मोबाइल चोरट्यांसोबत प्रतिकार करताना एका तरुणीचा धावत्या रिक्षातून पडून मृत्यू झाला होता. या घटनेनंतर चोरटे मोबाइल फोन घेऊन तीन हात नाका येथील उड्डाणपुलाखालून भिवंडीच्या दिशेने गेले होते. पोलिसांना या घटनेतील चित्रीकरण तपासायचे होते.

# शौचालये स्वच्छतेसाठी १६ कोटींचा ठेका

**पनवेल (दिगंबर जाधव)-** पनवेल महानगरपालिका प्रशासन एखाद्या कंत्राटाचा ठेका देताना तीन ते पाच वर्षांचा कालावधी कंत्राटदाराला नेमून देते. याबाबत महापालिका अधिनियमात नेमकी काय तरतूद आहे याची माहिती सभागृहाला द्यावी, असा प्रश्न विचारण्याची वेळ शुक्रवारी झालेल्या महासभेत विरोधी बाकांवरील सदस्यांवर आली. ऑनलाइन पद्धतीने झालेल्या सर्वसाधारण सभेत पनवेल पालिकेने पुढील तीन वर्षे शौचालये स्वच्छ करण्यासाठी १६ कोटी ३४ लाख रुपयांचा एकत्रित



ठेका देण्याच्या कामाला सत्ताधारी भाजपकडून मंजुरी देण्यात आली. सभागृहाचा कालावधी एकच वर्षांचा शिल्लक असताना प्रत्येक ठेक्याच्या प्रस्तावावर मंजुरी घेताना एका वर्षांचाच ठेका का दिला जात नाही, असा प्रश्न शेकापच्या सदस्या डॉ. सुरेखा मोहोकर, गणेश कडू, गोपाळ भगत यांनी उपस्थित केला होता.

## वसई-विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती (ई) नालासोपारा (पश्चिम), मुख्य कार्यालय विरार दूरध्वनी क्र. १२२५०-२४०२१७९/२४०२५६३**

महाराष्ट्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ४६९ अन्वये जाहिर नोटीस खालील मालमत्तेच्या हस्तांतरण संबंधाने वसई विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरणपरत्वे नोटीसीनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणत्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह वसई-विरार शहर महानगरपालिका प्रभाग समिती (ई) कार्यालय नालासोपारा येथे लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन महानगरपालिका दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

| अ.क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | रिसीट नं. | ज्यांचे नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरिदाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोपारा-१ | NL३१/११८/४५ | ३५०१ | पंकज पुरुषोत्तम गवस/पुरुषोत्तम गवस | दिपक गोपाल शर्मा/लक्ष्मी दिपक शर्मा |
| २ | सोपारा-१ | NL३१/५९/८ | ५२०२ | घोडके संजय जगन्नाथ/घोडके आशा संजय | संतोष लुलई गुप्ता / जितेंद्र लुलई गुप्ता |
| ३ | सोपारा-१ | NL३१/४३/११ | ०८९ | लक्ष्मण हरी भिंगोडे | मनिषा लक्ष्मण भिंगोडे |
| ४ | सोपारा-१ | NL३१/२९/६ | ३३१२ | अश्विनी चंद्रशेखर काळे | मिलिंद प्रकाश सुतार / अभिजित प्रकाश सुतार |
| ५ | सोपारा-१ | NL३१/९४/४ | २८३८ | माधुरी रुपेश नाईक | आसिफ अव्युब कडीवाला/साबिया आसिफ कडिवाला |
| ६ | सोपारा-१ | NL३१/५४/४ | ३४८६ | सोमाजी पी हुन्नरकर | रमेश सोमाजी हुन्नरकर |
| ७ | सोपारा-२ | NL३२/४३५/२४ | ३६७६ | अफिक ॲब्रोज कुरेशी | अफरोज जहान आफाक कुरेशी |
| ८ | सोपारा-२ | NL३२/५२२/६७ | २६७६ | अन्वर उद्दीन आर खान | नसीम बानो सलीम अंसारी |
| ९ | सोपारा-२ | NL३२/५९३/१८ | २६७७ | शब्बीर दस्तगीर शेख | रशीदा बानो मोहम्मद इब्राहिम |
| १० | सोपारा-१ | NL३१/११८/३० | ०६४ | निलेश परशुराम भाबळे/निधी भाबळे | रत्नाकर जे. देवरूखकर व प्रिती देवरुखकर |
| ११ | सोपारा-२ | NL३२/२२४/६ | ३५४८ | महेंद्र राजाराम पाटील | जुइता गौरव पाटील |
| १२ | सोपारा-२ | NL३२/५२२/४४ | ३४२५ | जावेदनूर मोहम्मद अली/साजीया जावेद शेख | सोफिया जाकीर हुसेन सय्यद |
| १३ | सोपारा-२ | NL३२/५२२/१० | ३४२७ | अनवर झाइदा अली | रेशमा मोहम्मद मेमीन |
| १४ | सोपारा-२ | NL३१/६८/०४ | ०६५ | वेंकटन पापू बालक्रिष्णन | प्रमोद काशीराम नानचे व हेमा नानचे |
| १५ | सोपारा-१ | NL३१/११०/१११ | ०६३ | पार्वती डि. माव | संदिप यशवंत मिठबावकर व समिक्षा मिठबावकर |
| १६ | समेळ-१ | NL०८/१३१/४ | ३९३९ | राजीव नामदेव दळवी | रेखा राजीव दळवी |
| १७ | समेळ-१ | NL०८/२७६/१५ | ३४२६ | नरेश दत्ताराम मोडकळे | मनोज वामन जाधव/ शितल मनोज जाधव |
| १८ | समेळ-१ | NL०८/२७४/२४ | ३४२४ | नावल मेहराम शेख | रुकसाना मीरजा |
| १९ | समेळ-२ | NL०९/११०/५ | ३४२९ | कुतूब इंटरप्रायजेस | नरेश बाळाराम सर्कले / सविता बाळाराम सर्कले |
| २० | समेळ-१ | NL०८/१२६/२ | ०१३ | मालती मधुकर पाटणकर | अविनाश आ. पाटणकर, राजीव आ. पाटणकर व संजिव आ. पाटणकर |

जा. क्र. व.वि.श.म./क.वि/३१३/२०२१-२२
दिनांक : १८/०६/२०२१

सही/-
**(धनश्री शिंदे)** सहा. आयुक्त
प्रभाग समिती (ई) नालासोपारा (प.)
वसई-विरार शहर महानगरपालिका

# जिल्हा परिषदेच्या शाळेत मागच्या वर्षीचाच पाढा

**विरार (सतिश सोनावणे)-** १५ जूनपासून तालुक्यातील सर्वच सुरू झाल्या आहेत पण करोना वैश्विक महामारीचा प्रभाव अजूनही असल्याने शाळांनी आपल्या शाळा ऑनलाइन पद्धतीने सुरू केल्या आहेत. अजूनही शासनाकडून कोणतेही निर्णय आले नसल्याने जिल्हा परिषद शाळेत शिकणारे विद्यार्थी शिक्षणाचे धडे कसे गिरवणार हा प्रश्न अजूनही अनुत्तरित आहे. करोना काळ सुरू असल्याचे नियमित शाळा सुरु झाल्या नाहीत. पण विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून खासगी आणि अनुदानित शाळांनी ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांच्या शिकवण्या सुरू केल्या आहेत. पण अजूनही जिल्हा परिषद शाळांच्या बाबतीत शासनाने कोणतेही निणर्य दिले नाहीत. पण मागील तीन दिवसापासून या शाळा ऑनलाईन पद्धतीने सुरु करण्यात आल्याची माहिती तालुका गटशिक्षण अधिकारी यांनी दिली आहे. शासनाने कोणतेही धोरण ठरविले नसल्याने मागील वर्षीचा कार्यक्रम पुन्हा राबविण्यास शिक्षकांना दिले असल्याचे त्यांनी सांगितले. मागच्या वर्षी शिक्षण विभागाने तालुक्यातील जिल्हा परिषद विद्यार्थ्यांचे सर्वेक्षण केले होते. यात स्मार्ट फोन वापरणारे पालक, दूरसंचाचा



वापर करणारे पालक आकाशवाणी वापरणारे पालक यांचे सर्वेक्षण केले होते. त्यानुसार विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जाणार होते. मागील वर्षीच्या आकडेवाडीनुसार दूरचित्रवाणीद्वारे १२ हजार ५७६ विद्यार्थी शिक्षण घेत असल्याचे सांगितले होते,त्याचबरोबर रेडीओवरून १० हजार ५८६ विद्यार्थी, संगणकद्वारे ६ हजार ७८० विद्यार्थी, मोबाइल डेटावरून केवळ १२४० विध्यार्थ्यांना शिक्षणाचे धडे गिरवाल्याचा दावा जिल्हा परिषद शिक्षण विभागाने केला होता. या वर्षी सुद्धा हीच पद्धत वापरली जाणार असल्याचे सांगितले आहे. पण मुळात हा अहवाल विश्वासार्थ नसल्याची टीका श्रमजीवी संघटनेचे अध्यक्ष विवेक पंडित यांनी केली आहे. विवेक पंडित यांनी माहिती दिली की, त्यांनी मागील वर्षी राज्यस्तरीय जिल्हा परिषद शाळांच्या ऑनलाइन पद्धतीचा आढावा घेतला होता. यात त्यांना शिक्षकांनी केवळ विद्यार्थ्यांना समाज माध्यमांच्या सहायाने पाठविलेले काही चित्रफित दाखविण्यात आल्या. पण विद्यार्थ्यांकडून कोणतीही प्रक्रिया कुठेही आढळून आले नसल्याचे त्यांनी सांगितले. तसेच अनेक पालकांकडे ऑनलाइन शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेली साधने नाहीत. दूरचित्रवाणी आणि आकाशवाणी यांसारखी माध्यमे केवळ एकतर्फी आहेत.

Printed, published and owned by **Rakesh Shankar Gore** and printed at Somani Printing Press gala no 3/4, amin Ind. estate, Sonawala Cross Road no 2, Goregaon (East), Mumbai-400063, Maharashtra and Published at Vishnu Sadan society, Ramchandra Sukhai chawl no 1, Room no 4, Jai hind nagar, Khar (East), Dist- Mumbai-400051, Maharashtra. **Editor: Rakesh Shankar Gore**
R.N.I. No. MAHMAR/2010/33301. Off. No.: 022-2651 5151 Mob. 9809386748 / 9803386748, **website:** maharashatracrimetimes.com, **Email:** Info@maharashtracrimetimes.com **Legal Advisor: D. K. Pandey (B.A.L.L.B.) (High Court Mumbai)**
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख ह्यामधील मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही (मुंबई न्याय कक्षेत)

# स्वबळावर शिवसेना कधी लाचार होणार नाही आणि कुणाच्या पालख्या वाहणार नाही पुढील वाटचालही खंबीरपणाने करू : वर्धापनदिनी मुख्यमंत्री उध्दव ठाकरेनी व्यक्त केला विश्वास

**मुंबई प्रतिनिधी (शुद्धोदन कठाडे):** शिवसेनेचा गेल्या पंचावन वर्षाचा इतिहास सर्वासमोर आहे, मराठी माणसाच्या न्याय हक्कासाठी जन्मलेल्या शिवसेनेने हिंदुत्वाच्या रक्षणाचाही नारा दिला होता यालाच स्वबळ म्हणायला हवे. या स्वबळाच्या आधारे शिवसेना कधी लाचार होणार नाही आणि कुणाच्या पालख्या देखील वाहणार नाही असे सांगत या पुढील वाटचालही खंबीरपणाने करू असा विश्वास मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यानी आज व्हर्चुवल वर्धापनदिनाच्या कार्यक्रमात बोलताना व्यक्त केला.

ते म्हणाले की आज दसरा मेळाव्यात जसे मुख्यमंत्रीपद बाजुला ठेवून तुमच्या समोर शिवसेना पक्ष प्रमुख म्हणून बोलण्यासाठी आलो होतो तसाच आलो आहे. मात्र नेमके काय बोलावे ते ठरवून आलो नाही. ते म्हणाले की, गेल्या पंचावन्न वर्षात न्याय आणि हक्काच्या संघर्षासाठी शिवसेना शिवसैनिकांच्या शक्तीने लढत पुढे आली आहे. मात्र गेल्या दिड वर्षात स्वाभिमानाने पक्ष पुढे जात असल्याने काही लोकांना पोटदुखी झाली आहे, त्याचे राजकीय औषध देवूच



मात्र शिवसेनेला स्वबळाच्या चर्चा करत आव्हान दिले जात आहे. तर हे स्वबळ म्हणजे काय? ते मराठीबाणा आणि हिंदुत्वासाठी लढताना आपण दाखवून दिले आहे असे ते म्हणाले.

ते म्हणाले की नुकत्याच झालेल्या बंगालच्या निवडणुकांत बंगाली माणसाने जे स्व त्वाची शक्ती दाखवली तशी शक्ती आपण उभी केली आहे. त्यासाठी आपली प्रादेशिक अस्मिता जपलीच पाहीजे. ते म्हणाले की, शिवसेनेने हिंदुत्व सोडल्याचा जे प्रचार करतात त्यांनी गैरसमज करून घेवू नये कारण हिंदुत्व हा आमचा श्वास आहे ते शेंडी जानव्याचे हिंदुत्व नाही. मात्र कोरोनाच्या संकटातही ज्यांनी विर्कत आणि विद्रुप राजकारण केले त्यांना शिवसेनेचे हिंदुत्व समजले नाही. असे उध्दव ठाकरे म्हणाले.

उध्दव ठाकरे म्हणाले की, हाणामा-या करणे रक्तपात करणे हेच शिवसैनिकांचे लक्षण नाही, सध्या काडकन आवाज काढण्याबाबत जी क्लिप व्हायरल झाली ती अन्याया विरोधात आवाज उठवण्याबाबत आहे. मात्र रक्तदान करत मानवतेचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक संकटात धावून येणा-या शिवसैनिकाचा धर्म हे आमचे हिंदुत्व आहे असे ते म्हणाले. ते म्हणाले की आमच्यावर वाटेल तसे आरोप करणा-यांना तू स्वत: कोण आहेस, तुझे चारित्र्य काय आहे हे आम्ही विचारणार नाही, कारण इतकी वर्ष शिवसेना राजकारणात राहिली आणि पुढे जात आहे ते लोकांच्या सहकार्यामुळेच घडले आहे हे स्पष्ट दिसते आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, खरेतर पक्षाचा वर्धापन दिन असा साजरा करण्यात मौज नाही, पण ही जबाबदारी म्हणून आपण सारे पक्षाच्या कार्यक्रमातही कोरोनामुक्तीचा संकल्प करत आहोत. कोरोना नंतरच्या काळात सत्तेचे आणि निवडणुकांचे राजकारण करण्यासाठी स्वबळाचा नारा आपण देत असू तर लोक आपल्याला क्षमा करणार नाहीत असे सांगत ते म्हणाले की देश आराजकाकडे जात असताना आर्थिक संकटातूनही त्याला बाहेर काढण्याचे आव्हान आता समोर आहे. त्यात विकृत राजकारण बाजुला ठेवले पाहीजे.

# प्रताप सरनाईकांच्या लेटरबॉम्बवर भुजबळ नाराज?; म्हणाले...

**नाशिक (प्रथमेश चव्हाण)-** 'प्रताप सरनाईक यांनी उद्धव ठाकरेंसोबत खासगीत बोलायला हवं होतं. राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, खडसे आणि मलादेखील असाच त्रास दिला होता. मात्र आम्ही ताकदीने उभे राहिलो,' असं विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केलं आहे. संभाजीराजे यांच्या उपस्थितीत आज नाशिक येथे मूक आंदोलन होत आहे. या आंदोलनात माहविकास आघाडीच्या नेत्यांसह भाजप नेतेही उपस्थित होते. त्यावेळी प्रसारमाध्यमांसोबत संवाद साधताना छगन भुजबळ यांनी प्रताप सरनाईक यांच्या लेटरबॉम्बवर प्रतिक्रिया दिली आहे.'ईडी आणि इतर यंत्रणांच्या त्रासामुळेच प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पत्र लिहलं आहे.



यापूर्वी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार, नेते एकनाथ खडसे आणि मला देखील असाच त्रास दिला गेला. मात्र, आम्ही ताकदीने उभे राहिलो, असं सांगतानाच प्रताप सरनाईक यांनी खासगीत उद्धव ठाकरेंसोबत बोलायला हवं होतं,' असं म्हणत छगन भुजबळ यांनी नाराजी व्यक्त केली आहे. 'शरद पवार, उद्धव ठाकरे आणि सोनिया गांधी जोपर्यंत एकत्र आहेत. तोपर्यंत राज्य सरकारला अजिबात धोका नाही,' असंही छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं आहे. तसंच, मराठा आरक्षणाबाबत पक्ष जी भूमिका घेईल तीच भूमिका माझी, असंही त्यांनी स्पष्ट केलं आहे. शिवसेना आमदार प्रताप सरनाईक यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना एक पत्र लिहलं आहे. या पत्रात केंद्रीय सुरक्षा यंत्रणांकडून होत असलेल्या त्रासामुळे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत भाजपशी युती करावी, अशी विनंती केली आहे.

# कॉल गर्ल्सच्या ONLINE सेक्स रॅकेटचा पर्दाफाश; ५ ते २० हजारात व्हायचा असा व्यवहार

**नवी दिल्ली (विशाल पाटील)-** कॉल गर्ल्सच्या ऑनलाइन टोळीचा भांडाफोड करण्यात पोलिसांना यश आलं आहे. याप्रकरणी पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे. त्यांच्या ताब्यातून एक कार, तीन मोबाइल फोन आणि २४,९३० रुपये रोकड जप्त केली आहे. अटक केलेल्या आरोपींच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी इतर आरोपींना पकडण्यासाठी आता छापेमारी सुरू केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार १९ जून रोजी एएचटीयू पोलिसांच्या पथकानं ऑनलाइन बुकिंगच्या माध्यमातून अवैध वेश्या व्यवसायात गुंतलेल्या टोळीचा भांडाफोड केला आणि बुद्धीमान लामा आणि मोनू या नावाच्या या दोन आरोपींना अटक केली. आरोपींनी सांगितले की, ते व्हॉट्सअप नंबरद्वारे लोकांशी संपर्क साधत असत आणि त्यांच्याशी बोलत असत. सौदा झाल्यावर हे लोक मुलींना हॉटेल, घर, फार्म हाऊस येथे गाडीने घेऊन जात असत. नोएडा



पोलिसांच्या एएचटीयू (अँटी ह्यूमन ट्रॅफिकिंग युनिट) ने या प्रकरणाचा छडा लावला आहे. आरोपींनी सांगितले की, ग्राहकांकडून मोठी रक्कम घेण्यात येत होती. ते ग्राहकांकडून पैसे रोखीने गोळा करीत असे. ग्राहकांकडून पाच हजार ते २० हजार रुपयांमध्ये व्यवहार निश्चित करण्यात येत होता. त्याच वेळी मुलींना मात्र प्रति ग्राहक १५०० रुपये दिले जात होते. नोएडा पोलिसांच्या एएचटीयू टीमला यांच्या व्हॉट्सअप क्रमांकाची माहिती मिळाली होती. त्यावरून त्यांनी या टोळीशी ग्राहक म्हणून संवाद साधला आणि दोन मुली बुक केल्या. पोलिसांच्या पथकाने त्यांना एका गेस्ट हाऊससमोर येण्यास सांगितले. त्यावर दोन्ही आरोपी मुलींना त्यांच्या गाडीत बसवून पोलिसांनी सांगितलेल्या ठिकाणी आले. साध्या वेशातील पोलिसांनी त्यासाठी बाहेर अगोदरच सापळा रचला होता. स्टिंग ऑपरेशन करण्यात आले आणि दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली. पोलीस पथक अटक केलेल्या आरोपींची चौकशी करत असून त्याद्वारे मिळणाऱ्या माहितीवरून पुढील कारवाई केली जात आहे.

# पुणे, लोणावळयात पर्यटकांवर कारवाई

**पुणे / लोणावळा (अभिजीत येरल्लू):** पर्यटनस्थळी बंदीचे आदेश धुडकावून वर्षाविहारासाठी लोणावळा, खंडाळा तसेच मावळ तालुक्यात आलेल्या ४२१ जणांविरोधात लोणावळा ग्रामीण पोलिसांनी रविवारी कारवाई करून त्यांच्याकडून दोन लाख ६२ हजारांचा दंड वसूल केला. पोलिसांनी ठिकठिकाणी नाकाबंदी करून पर्यटकांना माघारी पाठवून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली. मुंबई-पुण्यातील पर्यटकांची संख्या त्यात सर्वाधिक होती. लायन्स पॉइंट, टायगर पॉइंट, भाजे लेणी, कार्ला लेणी, लोहगड किल्ला, पवना धरण परिसरात पर्यटक रविवारी (२० जून) दाखल झाले. पोलिसांनी या भागात नाकाबंदी करून रस्ते वाहतुकीस बंद केले होते. पर्यटकांना माघारी पाठवून त्यांच्याविरोधात दंडात्मक कारवाई केली, अशी माहिती



लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी दिली. पर्यटनस्थळ बंदी आदेशाचे काटेकोरपणे पालन केल्याने पर्यटनस्थळ निर्मनुष्य झाल्याचे पाहायला मिळाले. लोणावळा शहर, ग्रामीण भागातील हॉटेल, बंगले, फार्म हाउस या ठिकाणी शासकीय नियमांचे पालन करून खोल्या आरक्षित करण्यास मुभा आहे. मात्र, पर्यटन स्थळे, मंदिरे, धबधबे, धरण परिसरात जाण्यास बंदी आहे. लोहगड, विसापूर, श्री एकवीरा देवी मंदिराकडे जाणाऱ्या मार्गावर नाकाबंदी होती. खडकवासला, सिंहगड परिसरात कारवाई सिंहगड किल्ला, खडकवासला धरण परिसरात पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर हवेली पोलीस ठाण्याच्या पथकाने कारवाई केली. खडकवासला, गोळेवाडी परिसरात नाकाबंदी करण्यात आली होती. मुखपट्टी परिधान न करणे, आदेश भंग केल्याप्रकरणी १३२ जणांविरोधात कारवाई करून त्यांच्याकडून ४७ हजार १०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.

# पुण्यात रेमडेसिव्हिर आता खुल्या बाजारात

**पुणे (कमलाकर दांगट)-** करोनाबाधितांची संख्या कमी होत असल्याने रेमडेसिव्हिर इंजेक्शनच्या मागणीत घट झाली आहे. या पार्श्वभूमीवर रेमडेसिव्हिर इंजेक्शनचे वितरण आता खुल्या बाजारातून करून देण्याचा निर्णय राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी याबाबतचे आदेश काढले आहेत. जिल्हाधिकारी यांच्याकडून १९ एप्रिलपासून या इंजेक्शनचे वितरण खासगी रुग्णालयांना करण्यात येत होते. त्यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडे खासगी रुग्णालयांकडून रोज किती रुग्णांना या इंजेक्शनची मागणी याची माहिती मागविण्यात येते. त्यानंतर रुग्णालयांना कोटा निश्चित करून वितरकामार्फत ते रुग्णालयांना पुरविण्यात येत होते. मात्र, गेल्या





काही दिवसांमध्ये जिल्ह्यात कोरोनाबाधितांची संख्या कमी होत आहे. तसेच काही रुग्णालयांनी करोनाच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा वापर कमी केला. त्यामुळे कोटा ठरवूनही काही रुग्णालये रेमडेसिव्हिर इंजेक्शन घेण्यास नकार देतात. त्यामुळे प्रशासनाकडे इंजेक्शन शिल्लक राहत आहे. आता या निर्णयानुसार रेमडेसिव्हिर हे इंजेक्शन खुल्या बाजारातून रुग्णालयांना मिळणार आहे. ज्या रुग्णालयांना याची गरज भासेल त्यांनी औषध पुरवठा दाराशी संपर्क करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे. ''जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत आतापर्यंत एक लाख ७८ हजार ७२४ इंजेक्शनचे वितरण करण्यात आले आहे. भविष्यात कोरोनाबाधितांची संख्या आणि या इंजेक्शनची मागणी वाढल्यास रेमडेसिव्हिर इंजेक्शन पुन्हा नियंत्रणात घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात येणार आहे.''

# समाजसेवकच निघाला 'हातभट्टी' वाला

**शिरुर (दिपेश गोरिवले)-** पुणे जिल्हयातील शिरुर तालुक्यातील मांडवगण फराटा येथे स्वयंघोषीत समाज सेवकच खंडणीखोर निघाला असून त्यासोबत असणारे त्याचे सहकारी जबरी चोरी करणारे असल्याने शिरुर पोलिसांनी धडक कारवाई करीत त्यांना जेरबंद केले आहे. स्वत:ला समाज सेवक समजणारा व सोशल मिडीयावर चुकीच्या व्हिडीओ क्लिपचा खुबीने वापर करून समाजामध्ये सामान्य लोक, व्यवसायिक यांच्या मध्ये भितीचे, दहशतीचे वार्तावरण निर्माण करून त्यांचे कडून खंडणी वसुल करणारा आरोपी अमोल उर्फ मिथुन आनंदा चौगुले व त्याचा सख्खा भाऊ पप्पु आनंदा चौगुले या दोघांना पोलिसांनी जेरबंद केले आहे. अमोल व पप्पू यांनी साथीदारांसह



एका हॉटेल मधील दारू ओतुन देत असल्याची व्हिडीओ क्लीप तयार करून ती सोशल मीडियावर व्हायरल केली. तो स्वतःच्या घरात हातभट्टीची दारू तयार करून त्याची विक्री करीत असताना त्यांस अटक करण्यात आली.

# अवैध शस्त्रांसह २१ वर्षीय तरुण अटक

**मुंबई (योगेश होळंब)-** मुंबई गुन्हे शाखेच्या युनिट ७ ने मुलुंड श्ल्ल्ह् परिसरामधून २१ वर्षीय तरुणाला शस्त्रांसह अटक केली आहे. आरोपीजवळून देशी बनावटीच्या १० पिस्तूल जप्त करण्यात आले आहे. आरोपी हे शस्त्रं कोणाला देण्यासाठी मुंबईमध्ये आला होता, या घटनेचा तपास केला जात आहे. आरोपीकडून १० पिस्तुलांसोबत १२ काडतुसे ही जप्त करण्यात आली आहे. केएफ मेडच्या ६ राउंडचाही यामध्ये समावेश आहे.

लखनसिंह आपल्या घरात शस्त्रे बनवत व विक्री करत असत. तपासामध्ये असे समोर आले आहे की, त्याचा मामासुद्धा आपल्या कुटुंबासह या व्यवसायात सहभागी असल्याचे दिसून आले आहे. आरोपी लखन सिंह याचे वय अवघे २१ वर्ष आहे. तो स्वत: अनेक वर्षांपासून वेगवेगळ्या शहरात शस्त्रं पोहोचवत आहे. याबाबत शंका येऊ नये, म्हणून अनेकवेळा तो खासगी वाहनांनी



प्रवास करत शस्त्रं पुरवत आणि मध्य प्रदेशात परत निघून जात होता. मुंबई गुन्हे शाखेचे डीसीपी ज्ञ्ज्झ अकबर पठाण यांनी सांगितलेल्या माहितीनुसार, आरोपीचे नाव लखनसिंह चव्हाण आहे. तो अवघ्या २१ वर्षांचा आहे. आरोपी मध्य प्रदेशमधील बरुवानी जिल्ह्यातील रहिवासी आहे. मध्य प्रदेशात अवैध शस्त्रे बनवण्याचा कारखाना सुरु केल होत. त्याठिकाणी त्याचे संपूर्ण कुटुंब या व्यवसायात सहभागी असल्याचे उघड झाले आहे. तो मुंबई, मध्य प्रदेश, गुजरात अशा अनेक ठिकाणी शस्त्रं पुरवत असल्याचे दिसून आले आहे. गुन्हे शाखेच्या पथकाला विश्वासार्ह सूत्रांकडून या बद्दलची माहिती मिळाली होती, की आरोपी एखाद्याकडे मोठ्या प्रमाणात शस्त्रे देण्यासाठी मुंबईमध्ये येत आहे, त्यानुसार त्यांनी त्याला अटक केल आहे. याच टोळीशी संबंधित व्यक्तींना काही वेळापूर्वी गुन्हे शाखेने शस्त्रांसह अटक केली होती. त्या आधारे पोलिसांना लखनसिंहबाबत माहिती मिळाली आहे.

# खूशखबर! केंद्रीय कर्मचाऱ्यांना मिळणार थकीत महागाई भत्ते

**नवी दिल्ली (अलीहूसेन शेखा)-** केंद्र सरकारी कर्मचाऱ्यांसाठी एक खूशखबर असून त्यांना गेल्या १८ महिन्यांपासून रखडलेला महागाई भत्ता आणि निवृत्ती वेतनधारकांना महागाई दिलासा लवकरच मिळणार आहे. याबाबत अर्थ मंत्रालयाकडून अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या नॅशनल काउन्सिल ऑफ जेसीएमची २६ जून रोजी डीओपीटी आणि अर्थ मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक पार पडणार आहे. या बैठकीत ही थकबाकी किंवा फरक कर्मचाऱ्यांना कसा अदा करायचा याबाबत चर्चा होणार आहे. याचा फायदा ४८ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांना तसेच ६० लाख निवृत्त कर्मचाऱ्यांना होणार आहे.

स्टाफ साईडच्या राष्ट्रीय परिषदेत कर्मचाऱ्यांचे वेतन



भत्ते आणि निवृत्त कर्मचाऱ्यांना महागाईतून दिलासा देण्यासाठी अर्थ मंत्रालयासोबत अनेक बैठका पार पडल्या आहेत. परिषदेचे वरीष्ठ अधिकारी शिवगोपाल मिश्रा यांच्या माहितीनुसार, अर्थ मंत्रालयात राज्यमंत्री अनुराग ठाकूर यांनी म्हटलंय की, कर्मचाऱ्यांना त्यांची डीएची रक्कम मिळेल. केंद्राचे ४८ लाख कर्मचारी आणि ६० लाख पेंशनर्स गेल्या १८ महिन्यांपासून महागाई भत्ते तसेच महागाई दिलासा मिळण्याची वाट पाहत आहेत. जानेवारी २०२० पासून हे भत्ते बंद मिळालेले नाहीत. याशिवाय दुसरे इतर भत्ते जसे एलटीसी देखील बंद आहे. कर्मचाऱ्यांचा डीए मे २०२० मध्ये २१ टक्के होता. एक जुलै २०२१ रोजी तो ३१ टक्के झाला.

सैन्यदल, रेल्वे, आरोग्य, ग्रामीण विकास, कृषी आणि इतर केंद्रीय मंत्रालयांमध्ये काम करमाऱ्या कर्मचाऱ्यांनी कोरोनाच्या काळात सरकारला मदत केली आहे. सरकारने २०२० च्या सुरुवातीला एक अचानक मोठी घोषणा केली होती, त्यानुसार केंद्रीय कर्मचाऱ्यांना डीए, डीआर आणि दुसरे भत्ते मिळणार नाहीत, असं म्हटलं होतं. पण त्यानंतरही कर्मचाऱ्यांनी सरकारसोबत कोरोनाच्या संकटकाळातही चांगलं काम केलं होतं. शिवगोपाल मिश्रा यांच्या माहितीनुसार, केंद्राला हे सांगाण्यात आलं आहे की, डीए, डीआर आणि एरिअर्स एकाच वेळी देण्यात यावेत.

# गावखडीत वादळापासून कासवांच्या अंड्यांचे संरक्षण

**रत्नागिरी (अमोल गुडेकर)–** 'निसर्ग' पाठोपाठ यावर्षी तौक्ते वादळ आले. यामुळे कासव संवर्धन मोहिमेला धक्का बसला आहे. यावर मार्ग काढत गावखडीतील कासवमित्र प्रदीप डिंगणकर, राकेश पाटील यांनी संशोधक सुमेधा कोरगावकरांच्या मदतीने संवर्धनाचा प्रयोग यशस्वी केला. कासवांनी किनाऱ्यावर घातलेली अंडी लाटांपासून वाचवली. त्याची योग्य पद्धतीने देखभाल केली. अशा संवर्धनामुळे १२० पैकी ५७ कासवांना जीवनदान दिले. कोरोनातील परिस्थितीसह निसर्गातील बदलांचा परिणाम कासवांचा विणीचा हंगाम २ महिने पुढे गेला होता. त्यात तौक्ते चक्रीवादळाचे सावट कासव संवर्धन मोहिमेवर निर्माण झाले होते. या वादळात अनेक किनाऱ्यावरील कासवांची



घरटी वादळात गेली; मात्र रत्नागिरीतील गावखडी येथील कासवमित्र प्रदीप डिंगणकर यांनी, त्यांची अंडी वाचवण्यासाठी सर्वप्रथम पावले उचलली होती. वनविभागाच्या मार्गदर्शनाखाली गावखडी किनाऱ्यांवर गेली अनेक वर्षे कासव संवर्धन मोहीम प्रदीप डिंगणकर, राकेश पाटील यांच्यासह त्यांचे सहकारी राबवित आहेत. तौक्ते वादळापूर्वी गावाखडी किनाऱ्यावरील घरटी 'मिड स्टेज'मध्ये म्हणजेच २८ दिवस झाल्यामुळे अंडी उबवण्याच्या स्थितीत होती. वादळाचा संदेश पाहता, ती कुठे ठेवायची, हाच मोठा प्रश्न त्यांच्यापुढे होता. त्यांनी घमेल्यात वाळू घेऊन त्यावर पाईप ठेवला. डिंगणकर यांचे सहकारी राकेश पाटील यांनी, अंड्यांना धक्का न लावता काळजीपूर्वक ती हलवली. दरम्यान, कासव संवर्धनात अंडी हाताळणे सर्वात महत्वाचे असते. त्या दृष्टीने भक्कम बांधलेल्या झोपडीत वाळूने भरलेली ती घमेलं ठेवली. यामध्ये सुमारे १२० अंडी ठेवण्यात आली. तौक्ते वादळ येऊन गेल्यानंतर रोज ती घमेलं बाहेरील हवेत आणून ठेवली जायची. पुढील पंधरा दिवस हा उपक्रम नित्यनियमाने सुरू होता. ५ ते ६ जूनला घमेल्यात ठेवलेली पिल्ले बाहेर येऊ लागली. अंड्यातून पिल्लं बाहेर पडताच सर्वांना सुखद धक्का बसला. या प्रयोगामुळे सुमारे ५७ पिल्लांना जीवनदान मिळाले.



# ग्रामपंचायत पालशेतच्या सदस्याविरुद्ध BDO गुहागरकडे तक्रार दाखल

## सदस्याच्या कामचुकार, बेजबाबदारपणाची सरपंच यांच्याकडून पाठराखण

**गुहागर प्रतिनिधी (योगेश होळंब):** ग्रामपंचायत पालशेतचे सदस्य पंकज बिर्जे यांनी १९ जून २०२१ रोजी पालशेत बाजार पुलाच्या प्रवाहामध्ये वाहून आलेला घन-कचरा, मोठमोठे झाडाचे ओंडके, वृक्ष हे JCBच्या सहाय्याने प्रवाहातून काढण्याचे काम केले. मात्र काढलेला घन-कचरा, मोठमोठे झाडाचे ओंडके, वृक्ष हे पुन्हा नदीपात्रात टाकले. यातून त्यांचा कामचुकारपणा निदर्शनास येत आहे. फुढे हा सर्व कचरा समुद्रात वहात जावून समुद्र तो कचरा पुन्हा परत किनाऱ्यावर फेकणार. समुद्रकिनार्याचे सौंदर्य खराब होणार त्यामुळे किनारा सुशोभीकरणासाठी पून्हा खर्च करावा लागणार. हा भ्रष्टाचार आहे. संदर्भात सदस्या विरोधात BDO मा. अमोल भोसले, पंचायत समिती गुहागर यांच्याकडे तक्रार देण्यात आली आहे. संबंधित प्रकरणात मा. विद्यमान सरपंच संपदा चव्हाण हया सदस्याच्या कामचुकारपाणाची पाठराखण करीत असल्याचे मत त्यांनी फेसबुक या सोशल माध्यमावर व्यक्त करत अनेक दिशाभूल करणारे अभिप्राय दिले आहेत. सदस्याच्या सदर कामाचा व्हीडीवो निदर्शनास आणून दिले असता माध्यमावर टीका-टिप्पणी करत ' सो कोल्ड रिपोर्टिंग' असे गौरोदगार काढले. यावरून सरपंच यांना पदाचा विसर व कर्तव्याची जाणीव नसल्याच दिसून येत असून सत्तेचा गैरवापर, आवाज दाबण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. आता स्थानिक ग्रामस्थांचे BDO, पंचायत समिती गुहागर काय कारवाई करतात याकडे लक्ष लागले आहे.

